तरुण भारत संवाद
बुधवार, ११ जून २०२५

# 'विवेकानंद' येथे २७ रोजी रोजगार मेळाव्याचे आयोजन



गोकुळ शिरगाव : येथे रोजगार मेळावा आयोजन बैठकीच्या वेळी उपस्थित पदाधिकारी.

वार्ताहर
गोकुळ शिरगाव

पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत दिनांक २७ जून रोजी कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेज येथे रोजगार मेळावा होणार असून याच्या आयोजनाची बैठक आज गोकुळ शिरगाव एमआयडीसी मध्ये घेण्यात आली.

रोजगार मेळाव्याचा मुख्य हेतू बेरोजगार युवकांना नोकरी मिळवून देणे हा आहे. या मेळाव्यात जिल्ह्यातून अनेक कंपन्यां सहभागी होणार आहेत. अर्जकर्त्या उमेदवाराला त्याच्या स्किलनुसार काम देण्याचे कार्य या कंपन्या करणार आहेत. वाढती बेरोजगारीची समस्या दूर करणे हेच या रोजगार मेळाव्याचे ध्येय आहे. या मेळाव्यामध्ये दहावी, बारावी, पदवीधर,इंजिनियर,मेकॅनिकल अशा सर्व पदवीधारकांना सामावून घेणार असल्याचे सहाय्यक आयुक्त कौशल्य विकास रोजगार व उद्योजकताचे अभियंता जमीर करीम यांनी सांगितले.

२७ जून रोजी कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेज येथे आयोजित करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. गोशीमा, मॅक, स्मॅक, कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन ,जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, कामगार आयुक्त,औद्योगिक प्रशिक्षण संस्था कोल्हापूर, मुरगुड, हातकणंगले, पन्हाळा या संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

उमेश देशमुख,स्वरूप कदम,राजू पाटील, दीपक चोरगे ,सुनील शेळके, अमोल यादव, महेश आवटे ,विजय नार्वेकर,विजय कुलकर्णी ,मोहन कुशिरे,विठ्ठल पाटील, भक्ती भद्रा उपस्थित होते.

तरुण भारत संवाद बुधवार, दि. ११ जून २०२५

11/6/25

11.6.25

# डॉ. बापूजी साळुंखे यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती साजरी करण्यात आली. शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या इमारतीसमोरील डॉ. बापूजी साळुंखे पूर्णाकृती पुतळयास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. तानाजी चौगुले, संशोधक विद्यार्थी, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

तरुण भारत संवाद ■ बुधवार, ११ जून २०२५

# इंटरनॅशनल ओपन चेसमध्ये कोल्हापूरचा ऋषिकेश दहावा

प्रतिनिधी
कोल्हापूर

दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या २१ वी दिल्ली इंटरनॅशनल ओपन ग्रँडमास्टर बी–कॅटेगरी चेस टुर्नामेंटमध्ये कोल्हापूरच्या ऋषिकेश कबनूरकरने दर्जेदार कामगिरी केली. त्याने स्पर्धेच्या १० फेरीत ८ गुणांची कमाई करत १० वा क्रमांक मिळवला. तसेच त्याला स्पर्धेत संयुक्तपणे तिसरा क्रमांकही मिळाला आहे. या यशासाठी त्याने ८ सामने जिंकण्याची कौतुकास्पद कामगिरी केली. दिल्ली बुद्धिबळ असोसिएशनच्या वतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

देशभरातील काही हजाराच्या घरात बुद्धिबळपटूंचा सहभाग असलेली ही स्पर्धा ए. बी. आणि सी अशा तीन गटांमध्ये आयोजित करण्यात आली होती. यापैकी बी कॅटेगरीमधून ऋषिकेशने स्पर्धेत प्रतिनिधीत्व केले. याच बी कॅटेगरीमधून देशभरातून ८५८ बुद्धिबळपटूंनी सहभाग घेतला होता. या सर्वांचे रेटिंग १९०० खालील होते. दरम्यान, स्पर्धेत ८५८ बुद्धिबळपटूंच्या तुलनेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तेलंगणा येथील सार्थक अदबतलाने विजेतेपद मिळवले. त्याला बक्षीस वितरण समारंभात ४ लाख रुपये व चषक असे बक्षीस देऊन गौरवले. दुसरा क्रमांक मिळवलेल्या सुंदरम कुमार (दिल्ली) याला ३ लाख रुपये, चषक असे बक्षीस देऊन सन्मानित केले. तसेच चेक तोहिलने तिसरा क्रमांक पटकावला. त्याला २ लाख रुपये, चषक असे बक्षीस देऊन गौरवले. याचबरोबर १० वा क्रमांक पटकावलेल्या कोल्हापूरच्या ऋषिकेशला ६० हजार रुपये, चषक देऊन गौरवले. ऋषिकेशची सख्खी बहीण शर्वरी कबनूरकरनेही बी–कॅटेगरीतूनच बुद्धिबळ स्पर्धेत प्रतिनिधीत्व केले होते. तीनेही चांगला खेळ करत ५ गुणांची कमाई केली. ऋषिकेश हा विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी असून त्याला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे.



■ टुर्नामेंटच्या बी कॅटेगरीत कामगिरी

DS/25